# प्रेस नोट

अँन्टी करप्शन ब्युरो,जळगांव
दि.०३.०९.२०२१

**आलोसे अनिल भगवान महाजन, वय ४० पोलीस अंमलदार बक्कल नंबर/२९६५, नेमणुक– फैजपुर पोलीस स्टेशन ता. यावल जि.जळगांव, यांना ५००/–रु.लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम स्वीकारतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जळगांव यांची कारवाई**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | घटक | :– | जळगांव |
| २ | गुन्हा नोंद कमांक | :– | फैजपुर पो.स्टे.गुरनं.१४४/२०२१ |
| ३ | कलम | :– | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम सन १९८८ चे कलम–७ प्रमाणे... |
| ४ | आरोपीचे नांव व कार्यालय | :– | अनिल भगवान महाजन, वय–४०, पोलीस अंमलदार बक्कल नंबर/२९६५, नेमणुक–फैजपुर पोलीस स्टेशन, रा.रावेर ता.रावेर जि.जळगांव. **(पोलीस विभाग–वर्ग ३)** |
| ५ | मागणी केलेली लाचेची तारीख व रक्कम | :– | दि.०३/०९/२०२१<br>५००/–रु.लाचेची मागणी |
| ६ | स्विकारलेली लाचेची रक्कम | :– | ५००/–रु. (त्यात १००/– रू.दराच्या ०५ नोटा अ.पा.लावलेल्या) ) |
| ७ | गुन्हा दाखल तारीख | :– | दि.०३/०९/२०२१ |
| ८ | थोडक्यात माहीती | :– | यातील फिर्यादी यांना आरोपी लोकसेवक यांनी तु गावठी दारुचे फुगे विक्रीचा धंदा करतो अशी मला गुप्त माहिती मिळाली आहे.तु गावठी दारुचे फुगे विक्री करतो, तु मला येवुन भेटला नाही, तर तुझ्यावर मी आता दारु विक्रीची केस करुन टाकतो, तु मला गावठी हातभट्टी दारु विक्रीचे दरमहा ५००/–रु.दे असे सांगितले. तेव्हा फिर्यादी यांनी अनिल महाजन, पोलीस अंमलदार यांना सांगितले की, मी हातमजुरी करणारा माणुस आहे. मला लॉकडाऊनमध्ये काम नसल्यामुळे मी मजबुरीने दारु विक्री करतो असे सांगितले असता अनिल महाजन पोलीस अंमलदार यांनी या महिन्यापासुन तुला दर महिन्याला ५००/–रुपये द्यावे लागतील व आता चालु महिन्याचे ५००/–रुपये देवुन दे, तु जर ५००/–रुपये दिले तर तुझ्यावर केस करणार नाही. परंतु तु जर ५००/–रुपये दिले नाही तर तुझ्यावर दारुची पक्की केस करुन तुला जेलमध्ये टाकुन देईल अस सांगितले. तेव्हा फिर्यादी यांनी त्यांना सांगितले आता माझ्याजवळ पैसे नाहीत मी तुम्हाला नंतर भेटतो व ५००/–रुपये देतो असे सांगितले. तेव्हा आरोपी लोकसेवक हे माझ्याकडे गावठी दारुचे फुगे विक्रीचा धंदा करु देण्यासाठी व माझ्यावर दारु विक्रीची केस न करण्याच्या मोबदल्यात ५००/–रुपये लाचेची मागणी करीत असल्याचे माझे लक्षात आले. त्याबाबत फिर्यादी यांनी दि.०३.०९.२०२१ रोजी अँन्टी करप्शन ब्युरो, जळगांव येथे तक्रार दिली होती.<br>सदर तक्रारीची अँन्टी करप्शन ब्युरो,जळगांव पथकाने दि.०३.०९.२०२१ रोजी पंचासमक्ष पडताळणी केली असता आलोसे अनिल महाजन,पोलीस अंमलदार फैजपुर पोलीस स्टेशन यांनी गावठी दारुचे फुगे विक्रीचा धंदा करु देण्यासाठी व दारु विक्रीची केस न करण्याच्या मोबदल्यात ५००/–रुपये लाचेची मागणी केली व सदर लाचेची रक्कम पंच साक्षीदारासमक्ष फिर्यादी यांचेकडुन स्वत: वर नमुद वेळी व ठिकाणी स्विकारली म्हणुन गुन्हा. |

**लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आव्हान करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणा–या लोकसेवकाबद्दल तकार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जळगांव कार्यालयात संपर्क करावा.**

**संपर्क पत्ता:– लाप्रवि.जळगांव कार्यालय**
**ईमेल आयडी:– dyspacbjalgaon@gmail.com**
**संकेतस्थळ:– acbmaharastra.nct**
**टोल फ्री कमांक:– १०६४**
**दुरध्वनी कमांक:– ०२५७–२२३५४७७**
**व्हॉट्सअॅप कमांक:– ८७६६४१२५२९**

03-9-2021

**शशिकांत श्रीराम पाटील**
**पोलीस उप अधिक्षक**
**अँन्टी करप्शन ब्युरो,जळगांव**